महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६
मुंबई विकास विभाग (B.D.D.) चाळींच्या क्षेत्रासाठी म्हाडास
नियोजन प्राधिकरणाचे अधिकार वापरण्यास परवानगी देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
क्रमांक : टिपीबी ४३१५ /१६७/ प्र.क्र. ५१/ २०१५/ नवि-११
मंत्रालय, मुंबई :४०० ०३२
दिनांक – १९ आक्टोंबर २०१६

शासन निर्णय : सोबतची इंग्रजी व मराठी अधिसूचना शासनाच्या साधारण राजपत्रात प्रसिध्द करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(किशोर द. गिरोल्ला)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

मा. मुख्यमंत्री महोदयांचे सचिव.
मा. मंत्री (गृहनिर्माण), यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री, नगर विकास विभाग यांचे खाजगी सचिव.

प्रति,

(१) प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
(२) महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका.
(३) मुख्य अधिकारी, म्हाडा, गृह निर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई : ४०० ०५१.
(४) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
(५) सह सचिव, तथा संचालक, नगर रचना, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
(६) उप संचालक, नगर रचना, बृहन्मुंबई.
(७) व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई.
( त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची शासकीय अधिसूचना महाराष्ट्र शासनाचे साधारण राजपत्रात भाग-१ मध्ये प्रसिध्द करुन त्याच्या १० प्रती नगर विकास विभाग (नवि-११), मंत्रालय, मुंबई : ४०० ०३२ व उपसंचालक, नगर रचना, बृहन्मुंबई यांना पाठविण्यात याव्यात.)
(८) कक्ष अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान विभाग ( त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतच्या अधिसूचना विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. )
(९) निवड नस्ती (नवि-११)

# अधिसूचना

नगर विकास विभाग
मादाम कामा रोड
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई :४०० ०३२
दिनांक :- १९ ऑक्टोबर, २०१६.

क्र. टिपीबी-४३१५/१६७/प्र.क्र.५१/२०१५/नवि-११

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६

ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने, शासन गृहनिर्माण विभागाकडील शासन निर्णय क्र. विविचा-२००७/प्र.क्र.५१/गृनिप. दिनांक ३०/०३/२०१६ अन्वये मुंबईतील वरळी, नायगाव, ना. म. जोशी मार्ग व शिवडी येथील मुंबई विकास विभागाच्या (B.D.D.) चाळींच्या (यापुढे "उक्त बी.डी.डी. चाळी" असे उल्लेखिलेले ) पुर्नविकासासाठी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास अधिनियम, १९७६ अन्वये गठीत असलेल्या महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्रविकास प्राधिकरणाची सुकाणु अभिकरण (Nodal Agency) म्हणून नियुक्ती केली आहे;

आणि ज्याअर्थी, शासन महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्र. जमीन - २५१५/६८१/प्र.क्र.५०(भाग-१) /ज-२, दि. २९ ऑगस्ट, २०१६ अन्वये वरळी, नायगाव व ना. म. जोशी या ठिकाणच्या बी.डी.डी. चाळी असलेल्या शासकीय जमिनी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडे वर्ग केलेल्या आहेत;

आणि त्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम २ च्या खंड (१५) चे उपखंड (ग) च्या तरतुदीनुसार मुंबईतील मुंबई विकास विभागाच्या चाळींच्या जमिनी, ज्या उक्त ज्ञापनान्वये खालील अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जमिनी म्हाडाकडे वर्ग झालेल्या आहेत त्या क्षेत्रासाठी, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे प्रकरण चार मधील नियोजन प्राधिकरणाने वापरावयाच्या शक्ती म्हाडाने मंजूर विकास योजना व विकास नियंत्रण नियमावली तसेच अंमलात असलेल्या इतर कायद्याच्या तरतुदीनुसार वापरण्यास, शासन याद्वारे परवानगी देत आहे.

## अनुसूची

| अ.क्र. | महसूल विभाग | भूकर क्र. | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| १) | लोअर परेल (वरळी) | १५३९ | १०६७७.८८ |
| | | १५४० | १३०७४६.९७ |
| २) | लोअर परेल (ना.म.जोशी मार्ग) | १०१ | ३२७१९.३२ |
| | | १०२ | २९७.६६ |
| | | २A/१०२ | ७६०.०४ |
| | | ४/१०२ | ६६.८९ |
| | | १०३ | १०३७.६३ |
| | | ३/१०४ | ३४७.९२ |
| | | १०५ | ११३८२.२६ |
| ३) | दादर नायगांव | ३/७१३ | ५०१.६७ |
| | | ७१४ | ३७३६४.०१ |
| | | १/७१३ | १५०.३२ |
| | | ७१३ | २६५४३.०३ |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने

(किशोर द. गिरोल्ला)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन